म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५८३
१५३८

# तालीम मेळा पद्यावली

## १९३८



मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. काव्य ११०६
ता. २९/१०
७०३२
REFBK-0005777
REFBK-0005777

प्रकाशक:—सोनबा लक्ष्मण निकम, ८८८ सदाशिव पेठ, पुणें.
मुद्रकः—विष्णु बळवंत लिमये, "शंकर मुद्रणालय"
६०८ सदाशिव पेठ, पुणें.

किंमत अर्धा आणा

# प्रभात वॉच कंपनी,

विश्रामबाग वाड्याजवळ

## — रेग्युलेशन मोफत —

घड्याळे दुरुस्त करणें अगर विकत घेणें पूर्वीं आमचा

**मोफत सल्ला घ्या.**

REFBK-0005777

REFBK-0005777

**तळेगांवकर**

स्पेशॅलिस्ट इन्

लेडीज अँड जेन्टस्.

पत्ता:—

**गायआळी रामाश्रमोर,**

...स फुलांचा उत्तम माल

**...के. इनामदार**

ब्राह्मण फुलवाले यांचेकडे

मिळेल.

८९२ सदाशिव पेठ,

शनीचापार रोड, पुणें.

**न्यू इरा टेलर्स.**

लेडिज अॅन्ड जेन्टस स्पेशालिस्ट

७१० सदाशिव पेठ, पुणें २.

[ गोरे प्रेस, पुणें २. ]

"उद्योग मंदिर"

# गाद्यांचा कारखाना

**आपल्या गाद्या, उशा, तक्के, लोड, रजया वगैरे उद्योगमंदिरांतच करून घ्या.**

कारण आमचे येथें एंजिनवर चालणाऱ्या व अत्यंत सुधारलेल्या अशा मशिनवर "कापसास कोणताहि अपाय न होतां" कापूस ढगासारखा साफ पिंजला जातो, व सर्व तऱ्हेचें पिंजारी काम कोणत्याहि इतर पिंजाऱ्यापेक्षां सुंदर व सफाईदार होतें.

**शिवाय माफक दर**

तरी एकवार आपण समक्ष या व काम देऊन पहा. अनुभवानें आपली खात्री पटेल.

**आमचे येथें हरतऱ्हेचा हलका-भारी कापूस, कापड काथ्या वगैरे माल बाजारभावानें मिळेल.**

व्यवस्थापक—**श्री. रा. साठे**

पत्ता:—'उद्योग-मंदिर, १००३ सदाशिव पेठचे हौदासमोर, पुणें २

# प्रभात वॉच कंपनी,

विश्रामबाग वाड्याजवळ

## — रेग्युलेशन मोफत —

घड्याळे दुरुस्त करणें अगर विकत घेणें पूर्वी आमचा

मोफत सल्ला घ्या.

REFBK-0005777

REFBK-0005777

तळेगांवकर...

स्पेशॅलिस्ट इन ...

लेडीज अँड जेन्टस.

पत्ता:—

गायआळी रामासमोर,

...ास फुलांचा उत्तम माल

...ा. के. इनामदार

ब्राह्मण फुलवाले यांचेकडे

मिळेल.

८९२ सदाशिव पेठ,

रानीचापार रोड, पुणें.

## न्यू इरा टेलर्स,

लेडिज अॅन्ड जेन्टस स्पेशालिस्ट

७१० सदाशिव पेठ, पुणें २.



[ गोरे प्रेस, पुणें २. ]

५० वर्षांची प्रतिष्ठा हेच त्यांच्या
प्रामाणिकपणाचें सर्टिफिकेट.

# बदललेला पत्ता

लक्षांत ठेवा ! फुलवाला चौक !!

साजूक तूप, व पवित्र केशराची सर्व श्रेष्ठ मिठाई,
श्रीखंड, बासुंदी, बर्फी, पेढे, व राघवदासाचे
स्पेशालिष्ट, बनविणार व विकणार

**पंड्या-शामळदास वजेराम.**

बासुंदीवाला. फुलवाला चौक,
टे. नं. ७७७ वेताळ पेठ, पुणें.

कोल्हापूरचे सिनेमा व महाराष्ट्र शाहीर संमेलनांत
नं. १ चे बक्षिस मिळालेले.

# श्री. पि. आर. सरनाईक,

शाहीर ( तिलक )

**मा. विनायक** यांच्या संगीत व मौज हास्यकारक नकला
हे प्रयोग सार्वजनिक उत्सव प्रसंगी अगर खाजगी करण्याचे
झाल्यास खालील पत्त्यावर चौकशी करावी.

श्री. एकनाथबुवा साठे (पैलवान)

फ्रूट मर्चंट रे मार्केट पुणें २.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥



पद नं. १

( चालः—चलत चलत मथुरा )

सफल करी सेवा, देवा ।
हीच भावना प्रभु या जगतीं ।
शंका तिळभर मनि ना ठेवा ॥ १ ॥
सुजन बोल नच फोल गणावा ।
प्रेम भाव प्रभु पायीं ठेवा ॥ २ ॥

पद नं. २

( चालः—गण )

गौरी तनया तूं दावी सुदीना पुनित करी आम्हा
योगी हृदय ध्याना ॥ धृ० ॥
देई भारता शुभवर विजया । सदा सुखवी सदया ॥
धरी करीं आजी शुभया, भारताना ॥ १ ॥
युग युगां करी वसती ईश्वरा । तुवां गजविली महीमा ॥
विभो अजुनि अवतरा, विनंती माना ॥ २ ॥
सांग सांग बा करीसी कधीं दया । त्याजी मौन्य राजसा ॥
नमि तव पद सदया, सौख्य द्याना ॥ ३ ॥

६७३२
स्थळ प्रत
सं. ... ता. ...

पुण्यांत उत्तम व वक्तशीर कपडे शिवून मिळण्याचें
एकच ठिकाण!
जंपर स्पेशॉलिस्ट ] सदरे ब्रदर्स [ सूट स्पेशॉलिस्ट
टेलर्स व आऊट फिटर्स सिनेमा व नाटकांचे ड्रेसमेकर्स
पत्ताः—६०९ सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणें शहर.

### पद नं. ३

( चालः–गुन्हेगारी )

सायकलवाले दादा काढा रुपाया बंदा ॥ धृ० ॥
म्युनिसिपालटीनें आपल्यासाठीं सडक डांबरी केली ॥
त्यामध्यें मेंबर राष्ट्रहिताचे ॥ गरीबाचे वाली ॥ १ ॥
घरें पाडुनि रस्ता केला तुमच्या सायकलसाठीं ॥
कर्ज काढुनि डांबर ओती ॥ आपली म्युनिसिपालटि ॥ २ ॥
खाच खड्डे कोठें दिसेनात गल्ली बोळांतून ॥
कचरा पेटी स्वच्छ आमुच्या ॥ नाहीं आतां घाण ॥ ३ ॥
फार दिवस डोके घासुनि ठराव पास केला ॥
असे मेंबर धर्मदातें ॥ आहेत पुण्याला ॥ ४ ॥
चुक म्हणजे एवढी आहे पाणी टाईमावर ॥
श्रीमंताला आहे बरं ॥ मजुरच मरणार ॥ ५ ॥

### पद नं. ४

( चालः–मला मुंबईला जायचय )

या फॅशनमुळें । झालें जन्माचें वाटोळें ॥ धृ० ॥
मर्दपणा नाहीं । सारे दुबळे होई । शब्द शूर सारे हो बनलें ॥ १ ॥
कोणी धक्का देती । मारहाण करती । सारे अवसान हो तुमचे गेलें ॥ २॥
झुलपें केस डोई । फ्रेंच कट ठेवी । जसे आईबाप ह्यांचे मेलें ॥ ३ ॥
नेक्टा कॉलर गळा । चिरोट आहे मुखा। युरोपीयन बीज जसे सजले ॥४॥


# मधुकर श्रीधर मोरे

सुती व रेशमी फॅन्सी कापडाचे व्यापारीं दिपावली
व दसऱ्यासाठीं नवीन स्टॉक
जकाते यांचे हॉटेल समोर
९८८ सदाशिव पेठ पुणें.

## पद नं. ५

**( चालः–मला मुंबईला जायचय )**

पहा ही सुधारणा। बोकाळली कशीं आतां ॥ धृ० ॥
स्नान संध्या नको ! देवपुजा नको। देशप्रेम गेले स्वर्गाला ॥ १ ॥
जुन्या चाली जाती। सर्व नव्या येतीं। सोडा परकीय अनुकरणाला ॥२॥
आतां आणा ब्रश। साफ करण्या दांत। नाहीं चालायचं येरवी मजला ॥३॥
शर्ट फॅशन बाज। कोटास दहा काजं। डबल ब्रेस म्हणती तयाला ॥ ४ ॥
सायकल पाहिजे मला। पायांखाली सदा। बॅन्ड आहे एम्प्रेस गार्डनला. ॥५॥
आतां आणा चहा। होईल मोठी मजा। रॉयल हॉटेल तरी हो पहा ॥ ६ ॥
आज जेवणाचा। थाट दीवाणचा। अर्धि पोळी कीं हो खाण्याचा ॥ ७ ॥
फॅशन तुम्ही करा। परिमनीं धरा। आज गुलाम परकीयांचा ॥ ८ ॥

## पद नं. ६

**( चालः–जगला कशासी )**

अस्पृश्य श्वान ठरला हा। ये काळ आज असला ॥ धृ० ॥
नर जन्म येऊनिया। पशुहून हीन केला ॥
उद्धार गांधी त्याचा सजला करावयाला ॥ १ ॥
यश यावयास लागे तस् कार्य। मंदीराला ॥
किर्ती घुमें त्रिखंडीं जगांत वंद्य ठरला ॥ २ ॥
अस्पृश्य हीन होतां। तो थोर आज ठरला ॥
हे धन्यवाद देती अस्पृश्य गांधीजीला ॥ ३ ॥


# के. व्ही. लिमये.

**मंडप कॉन्ट्रॅक्टर फर्निचर डीलर**

नाटकाचे पडदे व सर्व तऱ्हेची डेकोरेशन्स माफक
दरांत भाड्यानें मिळतील.
५२७ नारायण मोदी गणपती पुणें.

### पद नं. ७

(चालः—जाके मथुरा)

काळ ओढला तारा तुटला। पंडितजि गेला अपुला ॥ धृ० ॥
हिंद भूमिचा वीर पुत्र हा। स्वर्गवासी कां झाला ॥ १ ॥
विकसित जलजा वरतीं आतां। पर्जन्य करीं कावा ॥ २ ॥
गोर गरीब जन लोकांसाठीं। रात्र दीन तो झटला ॥ ३ ॥
राज सौख्य झणि झीडकारुनीया। सुख घे बंदी शाला ॥ ४ ॥

### पद नं. ८

(चालः—गुन्हेगार)

टेनन्सी बील आतां हो पास होणार ॥ धृ० ॥
एक मतानें विचार करिती ॥ कायदा पास करणार ॥
गरीब बीचारे शेतकऱ्यांची धुळधाण हे करणार ॥ १ ॥
तिजोरींमध्यें शिल्लक पडेना। विचार हे करणार ॥
कोणता कायदा पास करावा। होई मग भडीमार ॥ २ ॥
बील हे पास होती। दंगल खास उडणार ॥
गांवोगावीं रक्तांचा। मग सडा पहा पडणार ॥ ३ ॥
कुळामध्यें भांडणें होती। वैरी ते बनणार ॥
गरीब बीचारे शेतकरीं। ते दावेंदार होणार ॥ ४ ॥
पोटभर खाया त्यांना मिळेना। विचार कोण करणार ॥
ऐन वेळीं गरीब बिचारें। भुक्के कंगाल होणार ॥ ५ ॥
थोडासा तुम्ही विचार कराना। शेवटी काय होणार ॥
टेनन्सी हे बिल गरीबाला जाचक होणार ॥ ६ ॥

**गोरे आणि मंडळी**

**कापडाचे व्यापारी**

**दिवाळीसाठीं नवीन तऱ्हेची फॅन्सी पातळें व जरीकाठी लुगडी. समक्ष पहा.**

मराठी ग्रंथ संग्रहालय स्वतंत्र मत सं. क्रमांक २२०८ ता. २१।५० ठाणे.

**पद नं. ९**

**( चालः– मेरे मौला )**

माझे हिंद मातें । प्रणाम घेई गे ॥ धृ० ॥

प्रथम श्रीशीवराज यानें केला । तुजला द्वितीय घेसि शंभुराज प्राणधर्मी अर्पीला त्यानं स्मरसि तूं कां गे ॥ १ ॥ वीर तान्हा हाय गेला । गड सिंह सर केला पहा ॥ बाजीनें गाजी ही केली । खिंड पावन पहा । धड् धड् धड् तोफ ही वाजे ॥ २ ॥ वीर बाजी भाऊ राघू पेशवाई संपली । अंतस्थ कलहा मात झाली म्यान समशेर जाहली । काल फिरला वेगें ॥ ३ ॥ क्रुद्ध कां झाली कळेना शांति सागर आटला । सुपुत्र रत्ना करींच करती कंठ कां तव दाटला घेई घेई घेई ॥ ४ ॥

**पद नं. १०**

**( चालः– नंद के लाला मुरलीवाला )**

तिरंगी झेंडा । फडकूं लागला । जागे व्हा आतां बंधुनो ॥ धृ० ॥
झेंड्यासाठीं वीर ते गेले । नांव जगांमध्यें अमर केले ॥
घ्या हातीं तो तिरंगी झेंडा, जागे व्हा आतां ॥ १ ॥
सोलापूराला सोटेशाही । झेंडा आपुला पायां जाई ॥
दाद कुणाला नाहीं आजला । जागें व्हां आतां ॥ २ ॥
सत्याग्रहाला दंगल झाली । नोकरशाहीची फजिती केली ॥
तिरंगी झेंडा धरुनी हातीं । विजयीं तो झाला महात्मा ॥ ३ ॥
झेंड्या साठिं गेला बाबुगेनु । दावूनी आपल्या क्षात्र धैर्या ॥
वंदे भारत घोष करानां । जागें व्हां आतां ॥ ४ ॥
सुदीन आजला पहा हा आला । तिरंगी झेंडा भरत खंडाला ॥
विजयानें मग फडकें बोला । जागें व्हां आतां ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ८६३२ ठाणे


**विष्णु महादेव कुलकर्णी**

**फ्लॉवर मर्चंट**

श्रीमंत पूजनाचा पोषाख, लग्नाचा पोषाख, वरातीचा पोषाख, मोटार सजवणें, लहान मोठे गोटे व बटन, लहान व मोठमोठें कमान, खानी-हार व कंठे, झोपाळा सजवणें, बोहल्यावरील मंडपी अगर जाळीं.

**६०७ सदाशिव, देशमुखवाडा, पुणें २.**

## पद नं. ११

( चाल शनवारवाडा )

म्युनिसिपालिटी मध्यें धांदल झाली । मतनोंदणी सुरू केलीं ॥ धृ० ॥
मतदारांसाठीं खटपट मोठी । धांदल फार झाली ॥ १ ॥
निवडून आल्यावर । गर्व चढणार । पर्वा तुमची नाहीं ॥ २ ॥
डांबरी सडकही । छान करीना । मध्येंच खड्डा राही ॥ ३ ॥
मतदारांसाठीं । यादी करांना । मयत यादी राही ॥ ४ ॥
नोटा सोडाना । मिळे मनाला । विकत मतें देऔ ॥ ५ ॥
मुत्रें कोठें नाहीं । कोसकोसहीं । दंड फार होऔं ॥ ६ ॥
विनंती माझी । मेंबर लोकांला । करा सुधारणा कांहीं ॥ ७ ॥

## पद नं. १२

चाल ( हा बघ आला )

बेकार झाला कंगाल बोला । बेकारी जगताला ॥ धृ० ॥
नोव्हेकन्सी पाटी दाराला । गरीब बिचारा हा मेला ॥ १ ॥
नोकरी साठीं फार हिंडला । हात लावी नशिबाला ॥
अफू खाऊन जीव देऔ । मुक्ले पाहा जगताला ॥ २ ॥
विनंती माझी मंत्रि लोकांला । बेकारी या कायद्याला ॥ ३ ॥
अुद्योगधंदा सुरू करा । वांचवा गरिबांना ॥ ३ ॥

आपणास सुंदर कपडे

**दाबके कंपनीत**

शिवून मिळतील.

**गोखले ब्रदर्स बुक बाईंडर्स**

यांचे येथें बुक बाऔंडींग, फ्रेम मेकींग व नकाशाची कामें
काळजी पूर्वक होतात.

पेरु गेट सदाशिव पेठ लिमये वाडी २५२।१४

## पद नं. १३

**( चालः—आला हांसत खुळा सर्मींदर )**

फॅशन आली बघ नवलाची आजला। गंमतीची फॅशन आजला गंमतीची ॥ धृ ॥

बोडके हिंडता वीर। जणूं दिसे खरा बहाद्दर ॥
ताकद नाहीं गप्पा देई फॅशनच्या ॥ १ ॥
टेनीस क्रिकेट हा आला। मर्दानी खेळ लयाला ॥
बैठा राजी होई आजी फॅशनच ॥ २ ॥
जोर बैठक ठाऊक नाहीं। परीट घडी खराब माजी होई ॥
परवां नाहीं शौर्याची जाओ ॥ ३ ॥
देव धर्म नको आम्हांला। नच घरी पुसे बापाला ॥
कर्ज काढीं चढतो माडी ॥ ४ ॥
फॅशनमुळें देश हा गेला। परक्याच्या हाती घातला ॥
जागे होई देशापायीं ॥ ५ ॥


**एस. एस. बहुलीकर**

जंपर ] लेडीज ॲण्ड जेन्ट्स् टेलर [ स्पेशॅलिस्ट

बुधवार पेठ, दुकान नं. ९ हुजूरपागेसमोर, पुणें सिटी.

आमच्या येथें सर्व तऱ्हेचे फॅन्सी पोलके, फ्रॉक्स, जंपर, सूट्स् शिवून व विकत मिळतील.

**करपे ब्रद्र्स**

येथें सर्व प्रकारचें रोल्ड गोल्डचें दागिने व चांदीचे गिलिट करून मिळेल. सोन्याचे वर्क करून मिळेल.

पत्ता:—तुळशीबाग, पेठ शुक्रवार, पुणें

**पद नं. १४**

**( चालः—अजी हौस जीजीची )**

पहिले नमन हिंद मातेला । जाऊं शरण श्री शिवबाला ॥ धृ० ॥
स्वराज्य स्थापक तूंची पहिला ।
माताभवानी प्रसन्न बा तुजला ।
तोडीले मोंगल पाशाला । जाऊं शरण श्री शिवबाला ॥ १ ॥
हिंदू धर्म बुडूं लागला ॥
शिवाबाई त्या वेळेला । येई जन्मा शिवनेरीं किल्ल्याला ॥ २ ॥
केले रक्षण हिंदू धर्माचें राखीले ब्रीद ।
क्षत्रीयांचे असा जगीं जयाचा बोल बाला ।
जाऊं शरण श्री शिवराजाला ॥ ३ ॥
तीच वेळ या समयाला । येऊनी तोडी पाशाला ॥
आलो शरण हिंदमातेला । शिवबा की जयजय बोला ॥ ४ ॥


**व्ही. व्ही. निजामपूरकर**

स्टोव्ह, सायकल, व गॅसबत्त्या काळजीपूर्वक रिपेअर करून मिळतील व गॅसबत्त्या भाड्यानें मिळतील.

**९१० सदाशिव, फडतरे चौक पुणें.**

**पी. जी. दाबक अँड को.**

**पेन्टर अँड रबर स्टँप मेकर्स**

**विश्रामबाग वाड्यासमोर पुणें २.**

**सूचनाः—भावाबद्दल अवश्य चौकशी करा.**

### पद नं. १५

अद्‌भूत संग्राम झाला। रावजी अद्‌भुत संग्राम झाला ॥ धृ० ॥
निश्चय सशानें केला। बल सिंहासी लढण्यांला ॥
सिंहाला चीत केला ॥ रावजी ॥ १ ॥
जेव्हां ससा वीर निघाला। चेष्टा जो तो करूं लागला।
कोणी नुसताच आ वासिला ॥ २ ॥
अमेरिका पाहूं लागली। फ्रांसची दृष्टी वळलीं ॥
जर्मनीहिं देखू लागली ॥ ३ ॥
एकी काय न करीं। क्षुद्र ग्रासें बांधीती करीं ॥
जाणुनी वीर निघाला ॥ ४ ॥
वीरसशाचें अनुयायीं ! सरसावले सारुनीं बाहीं ॥
त्याच्या कोणि मिशाच उपटुं लागलें ॥ ५ ॥
चहूंकडून सिंह कावला। रौद्ररुप धरिता झाला ॥
वीर तितक्यांस पुरुन उरला ॥ ६ ॥
मग युक्ती करितो मनीं। म्हणें तुम्हीं सर्वजनीं ॥
आमच्या घरीं चला ॥ ७ ॥
सोडूनी दिले वीर सशाला। सांगूनी विचार तव मला ॥
आमच्या घरीं तुम्हीं चला ॥ ८ ॥
मी सांगेन तसें वागशील। मी सांगेन तसे करशील ॥
तर येतो तुझ्यां घरांला ॥ ९ ॥
सिंह तयाला कबूल झाला। मग ससा वीर निघाला ॥
सिंह ससा समतोल झाला ॥ १० ॥


# सुदर्शन टी हाऊस

**१ पैसा सर्व जिन्नस**

**ताजा व स्वच्छ माल मिळण्याचें एकच ठिकाण**

सदाशिव विश्रामबाग टांगा स्टँड **पुणें,**

## पद नं. १६

**( चालः–शिंग फुंकीत आला )**

चला शिवनेरीं शिवरायाचें दर्शन घेऊं ॥ धृ० ॥
शिव जन्मास आला । वचक यवनाला । डोळें भरुन राया पाहूं ॥ १ ॥
भगव्या झेंड्याचें । राज्य मराठ्यांचें । त्याच्या किर्तीचा पोवाडा गाऊं ॥ २ ॥
दिलदार राजा झाला । धर्म रक्षीयेला । त्याचें नांव जगांत गाऊं ॥ ३ ॥
मावळें घेऊन हातीं । आण राष्ट्रासाठीं । धर्मवीर राजा आपण पाहूं ॥ ४ ॥
वंदन करितो तुला । धावून येई काला । आतां राखा मराठ्यांचें नांव ॥ ५ ॥

## पद नं. १७

**( चालः–आला खुशीत समिंदर )**

हें आलें स्वयंवर । आलो घोड्यावर
मताची याचना करूं । जनहो०

झाली आठवण तुमची आतां ।
मतासाठीं फिरतो स्वतः ।
वाक वाकुनी जोडतो हाता ।
कार्य झाल्यावर, येईन जोरावर,
देईना तुम्हां ठरुं ॥ १ ॥ जनहो०

वचने बहुत आजवर दिली ।
भोळी जनता म्यां फसविली ।
पैशाची अमीष दाविली ।
देता मतें तरी, कां न तुम्हांवरी,
कराचा बोजा करुं ॥ २ ॥ जनहो०

लोकहितार्थ निवडून यावं ।
नाहीं माझ्या मनाला ठाव ।
स्वार्थ माझा त्यातला डाव ।
निवडून आल्यावर माझी कशी बर,
देईन केव्हां जिरु ॥ ३ ॥ जनहो०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ठाणे.

## पद नं. १८

( चालः–**मन शुद्ध तुझे** )

सिंहराज हिंदू आज कैसे झोपले । या रजनी माजी ।
रजनी चराचेच फावलें । जगत लूटले ॥ धृ० ॥
तिन रंगी बावटा । हा फडके आकाशी ।
ये कि माजी सौख्य असे हिंदुस्थानासी ।
होता जागा पंचानन कोल्हे पळाले ॥ १ ॥
या रजनी ॥ वाणी धनी झाले असे राज्य स्थापले ।
साधे भोळे हिंदवासी दास बनले ।
कपट कृत्य ज्याचे त्यास नडू लागले ॥ २ ॥ या रजनी ॥

## पद नं. १९

( चालः–**शिंग फुंकीत गेला** )

स्वास्थ्य आले बिघडवूं जगाचे अरेराव ॥ धृ० ॥
लोकशाहीवरी, आली संक्रांत खरी
पाहु कोणाचा होईल डांव ॥ १ ॥
हिटलर जर्मनीचा, सिनॉर इटलिचा
जपानालाहि सुटली हांव ॥ २ ॥
इथोपिया अेके आस्ट्रिया दुजे
मँचुरियासी मँच्युको नांव ॥ ३ ॥
खाल्ले इतके जरी, नाहीं भूक पुरी
येते कोणावर धाड आतां पहावे ॥ ४ ॥
शस्त्रास्त्रांचा जोर यांचा असे फार
म्हणुनि लागतसे यांना भ्याव ॥ ५ ॥
शेरा सव्वाशेर भेटेल एकदां तर
खुण गांठ बांधुनि राहावं ॥ ६ ॥
तत् पूर्वीं पण माजेल जेव्हां रण
कोट्यावधि मरतील जिव ॥ ७ ॥
प्रार्थि भगवंता गोविंद जोडुनि हातां
जगां तुंचि आतां वाचिव ॥ ८ ॥

पद नं. २१

( चालः—झुम, झुम, चालसखें )

झणीं क्षणीं, तोडीमोडी। ही बेडी पारतंत्रेची
ऊघडी नयना या मोरयारें
झडकरीं धाव घेई या गजवदनारें
अज्ञ बालकें नमन करीतो
प्रेम—भावें स्तवन गातो
हचि विनंती या ईशा ॥ १ ॥

## निरोप घेतांना

दरसालप्रमाणें यंदाहि आम्ही ही पद्यावली तयार करवून घेऊन मेळ्याची तयारी केली आहे. आणि अशा रीतीनें गणेशोत्सवांत श्रीगणरायाची व जनतेची अल्प सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे. या कामीं कवीवर श्री. **दिघे, शिंदे,** व **शाहीर श्रीधर** यांनीं आम्हाला अमोल साह्य केले आहे. याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों. जनतेनें ही सेवा गोड करून घ्यावी ही विनंती.

मालक—**सोनबा लक्ष्मण निकम.**
म्यानेजर—**रामभाऊ विठोबा काळे**
म्यानेजर—**बबन तुकाराम गंजीवाले**

REFBK-0005777
REFBK-0005777

एस. जी. दाबक अॅन्ड को. टेलर्स
सदाशिव पेठ, गायआळी चौक पुणें नं. २
येथें सर्व तऱ्हेचें फॅशनेबल कपडे वेळेवर शिवून मिळतील.

प्रो. काची—गोसावी यांचे दिलखेच मर्दानी खेळ.
रे-मार्केट पुणें येथे चौकशी करा,

दररोज नवीन व ताजा माल मिळण्याचें
एकच ठिकाण म्हणजेच

# संतोष भुवन

प्रो:—गिरियप्पा लक्ष्मण मिजार.

हुजूरपागेसमोर, बुधवार पेठ पुणें २.

# 'सत्यनारायण बोर्डिंग

**९९४ सदाशिव पेठ, पुणें**

ताजे व स्वच्छ चमचमीत जेवण मिळत असल्यामुळें, विद्यार्थी, व्यापारी व प्रवासी लोकांना पसंत पडलेलें एकच ठिकाण. अवघ्या १२ रुपयांत दर बुधवारी चेंज व संडे फीस्ट. एक वेळ अनुभव घ्या.

**व्यवस्थापक सत्यनारायण बोर्डिंग**

# धी न्यू आनंद भुवन

**सदाशिव पेठ, पुणें**

येथें उत्तम ताजा माल मिळणारा, चहा, कॉफी व इतर फराळाचे जिन्नस. मिळण्याचें एकच ठिकाण.
एक वेळ अनुभव घ्यावा.

**प्रो. शंकर रंगप्पा नाईक**

# कॉमनवेल्थ
# ॲशुअरन्स कंपनी लि.

मनुष्याच्या जीविताची किंमत अमोल आहे. परंतु **आयुर्विम्याचे** योगें मनुष्याच्या जीविताची किंमत वाढविता येते व त्यामुळें कुटुंबांतील माणसे व उद्योगधंदे यांस संरक्षण मिळून, मनुष्याच्या मृत्युमुळें अगर वार्धक्यामुळें होणारा तोटा भरून निघतो.

आयुर्विम्यांतील समाजसेवेचा मुख्य हेतु लक्षांत घेऊन, कॉमनवेल्थचे चालक, विमेदारांच्या व विमा प्रचारकांच्या सर्व गरजांचा अत्यंत सूक्ष्म रीतीनें विचार करतात.

भरपूर भांडवल व अत्यंत चोख व सुयांत्रित व्यवस्थेखालीं असलेलीं "कॉमनवेल्थ विमा कंपनी" ही तुमची व तुमच्या विमेकरूंची कामगिरी योग्य रीतीनें बजावीत आहे असें तुम्हांस आढळून येईल.

रा. न. अभ्यंकर, बी. ए. एल्‌एल्. बी.

मॅनेजिंग एजंट

दि कॉमनवेल्थ विमा कंपनी लि. पुणें.